कोळशेवाडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतूक अधिसूचना/ ९४ /२०२६ दि. २४ /०४/२०२६

–: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

ज्याअर्थी, कोळसेवाडी वाहतूक उपविभागाचे हद्दीत अजवानी मेटकॉन्स, मुबई याचेकडुन एम.आय.डी.सी. रोडवरील अभिनव शाळेसमोरील भुखंड आर.एच.२२७ व नानासाहेब धर्माधिकारी रस्त्यावरील भुखंड क्रमांक आर.एच.१२२ येथील जुना दगडी पुल तोडुन त्या ठिकाणी नवीन पुलाचे बांधकाम दिनांक २७/०४/२०२६ रोजी पासुन करण्यात येणार आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. –

प्रवेश **बंद** –	**१)** डी.एन.एस. बॅक चौकातुन आईस फॅक्टरी, मानपाडा रोड, डोंबिवली पुर्व कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **नानासाहेब धर्माधिकारी जाणाऱ्या रोड समोर, डोंबिवली पुर्व** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने नानासाहेब **धर्माधिकारी** मार्गाने **इच्छित स्थळी** जातील.
प्रवेश **बंद** –	**२)** मानपाडा रोड आईस फॅक्टरी, डोंबिवली पुर्व कडुन डी.एन.एस.बॅक चौक कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **टेम्पो नाका, सागर्ली जिमखाना रोड समोर 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी **मार्ग** –	सदरची वाहने मानपाडा सागाव मार्गे किंवा जिमखाना रोडने **इच्छित** स्थळी जातील.

सदर अधिसूचना दि. २७/०४/२०२६ रोजी पासुन पुढे काम पुर्ण होई पर्यंत अमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील **वाहनांना** लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर,
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण
नियत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर
ठाणे पोलीस पत्रक.
प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकाच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.
प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.

२/– सदर अधिसूचना **पोलीस** नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– स.पो.आ. **कल्याण वाहतूक विभाग**/पोनि कोळशेवाडी, **कल्याण, डोंबिवली, वाहतूक उपविभाग**.
२/– म.न.पा.कल्याण–डोंबिवली **च्या** संबंधीत अधिकाऱ्याकडून **आवश्यक सूचना फलके** लावून घ्यावीत.